**पिंपरी चिंचवड महानगरपालिका क क्षेत्रीय कार्यालय**

**कार्यपत्रिका क्रमांक-३**

**सभावृत्तांत**

दि.- ०३/६/२०१५ वेळ -दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०३/६/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा. मोटे किरण बाळासाहेब** **सभापती**
२) मा.सावळे सिमा रविंद्र
३) मा.भोसले राहूल हनुमंतराव
४) मा.पालांडे सुजाता सुनिल
५) मा.शितोळे शैलजा बाबुराव
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
८) मा.प्रशांत शितोळे
९) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
११) मा.शेंडगे आशा सुखदेव

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.संजय खाबडे -कार्यकारी अभियंता विदयुत, मा.सोनवणे-उपअभियंता,विदयुत, मा.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, मा.वायकर- उपअभियंता स्थापत्य, श्रीमती अनघा पाठक- उपअभियंता जलनि:स्सारण,मा.पुजारी- उपअभियंता (झोनिपू), मा.जावळे-उपअभियंता पापू, मा.उगले-लेखाधिकारी, श्री.शेख-कनिष्ठ अभियंता (विदयुत), श्री.रमेश भोसले- मुख्य आरोग्य निरीक्षक हे अधिकारी उपस्थित होते.

----

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

---

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-२ ) रस्त्याला नांव देणेबाबत-मा.अतुल नानासाहेब शितोळे,मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमंक- ३) सभेची वेळ बदलणेबाबत-मा. अतुल नानासाहेब शितोळे,मा.सिमा सावळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) जिजाऊ सांस्कृतिक हॉल मधील रुम सार्वजनिक संघटनांना वापरासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत- मा.सुजाता पालांडे, मा. अतुल नानासाहेब शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) स्पर्धा परिक्षेस नांव देणेबाबत- मा.आशा शेंडगे,मा.सिमा सावळे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) सांगवी दापोडी येथील नदीपात्रातील जलपर्णी तातडीने काढणेसाठी केलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत व तरतुद वर्ग करणेस मान्यता मिळणेबाबत..

विषय क्रमांक-७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही प्रमाणात सुधारणा व बदल होणेबाबत- मा.प्रशांत शितोळे,मा.रोहितअप्पा काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-८) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या बांधकाम नियमावलीत बदल करणे व या नियमावलीस महाराष्ट्र शासनाचे नगरविकास खात्याकडून मान्यता घेणेबाबत- मा.प्रशांत शितोळे,मा.रोहितअप्पा काटे यांचा प्रस्ताव.

------

दिनांक ६/५/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.२ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

ठराव क्रमांक- ११८ विषय क्रमांक- १
दिनांक- ०३/६/२०१५ विभाग-
सुचक-मा. किरण मोटे अनुमोदक-मा.अतुल शितोळे
संदर्भ- सन्मा.सदस्य सदगुरु कदम व मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव-

**विषय- मुंबई-पुणे महामार्गाला लागून डाल्को कंपनीच्या बाजूने पिंपरी कॅम्पकडे जाणा-या रस्त्यास व पिंपरी रेल्वे मार्गाच्या अंडर बायपास भूयारी मार्गास "दिवंगत एच.ए.कामगार महादेव गोविंद कदम भूयारी मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत....**

**मा.किरण मोटे- सदर रस्त्यास व भूयारी मार्गास नांव देणेचा ठराव ड प्रभाग समिती सभेमध्ये यापुर्वीच झाला असल्याने विषय क्रमांक १ दप्तरी दाखल करणेत येत आहे.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक- ११९ विषय क्रमांक- २
दिनांक- ०३/६/२०१५ विभाग-
सुचक-मा. अतुल शितोळे अनुमोदक- मा.सुजाता पालांडे
संदर्भ- सन्मा.सदस्य मा.अतुल शितोळे व मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव-

नवी सांगवी येथील सर्वे नं.७९ येथील रस्त्याला " **स्वर्गीय खंडेराव गोविंदराव ढमाले पथ**" असे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- १२० विषय क्रमांक- ३
दिनांक- ०३/६/२०१५ विभाग-
सुचक-मा. अतुल शितोळे अनुमोदक-मा.सिमा सावळे
संदर्भ- सन्मा.सदस्य मा.अतुल शितोळे व सिमा सावळे यांचा प्रस्ताव-

क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या बुधवारी दु. ३.०० वा. ऐवजी सकाळी ११.०० वाजता** (पहिल्या बुधवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेल तर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- १२१ विषय क्रमांक- ४
दिनांक- ०३/६/२०१५ विभाग-
सुचक-मा. सुजाता पालांडे अनुमोदक- मा.अतुल शितोळे
संदर्भ- सन्मा.सदस्या मा. सुजाता पालांडे ,मा.अतुल शितोळे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची वार्ड नं३९ संत तुकारामनगर येथे जिजाऊ सांस्कृतिक हॉल ही इमारत आहे त्यामध्ये रिकाम्या खोल्यामधील पुढील सामाजिक संघटनांना सार्वजनिक वापरासाठी प्रत्येकी एक रुम देणेत यावी. १) अखिल संत तुकारामनगर महिला प्रतिष्ठान- १ रुम २) पंचशिल जेष्ठ नागरिक संघ संत तुकारामनगर- १ रुम वरील संघटना १ मध्ये महिला संघटना व २ मधील जेष्ठ नागरिक आहेत ते इतरत्र बसतात त्यांना एकत्र ठिकाणी येणेसाठी हक्काची जागा प्राप्त होईल. महिला प्रतिष्ठानचे कार्य हे सामाजिक असून तसेच महिलांनी प्रेरणादायी आहे.महिला प्रतिष्ठा तर्फे घेण्यात येणारे सर्व उपक्रम समाजहिताचे असल्याने सध्याची जागा नियमानुसार दिर्घकाळासाठी मोफत देण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- १२२ विषय क्रमांक- ५
दिनांक- ०३/६/२०१५ विभाग-
सुचक-मा. आशा शेंडगे अनुमोदक- मा.सिमा सावळे
संदर्भ- सन्मा.सदस्या मा. आशा शेंडगे, मा.सिमा सावळे यांचा प्रस्ताव.

कासारवाडीतील करसंकलन ऑफीसच्या वर असलेल्या जागेत स्पर्धा परिक्षा केंद्र तयार करण्यात आले आहे. त्या स्पर्धा परिक्षेचे अनावरण करावयाचे आहे तरी त्या केंद्रास **"नेताजी सुभाषचंद्र बोस"** असे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- १२३ विषय क्रमांक- ६
दिनांक- ०३/६/२०१५ विभाग-
सुचक- मा. आशा शेंडगे अनुमोदक- मा.अतुल शितोळे
संदर्भ- मा.क्षेत्रीय अधिकारी क यांचे जा.क्र.कक्षे/१५/ कावि/४५९/२०१५ दि.२/६/२०१५

मा.क्षेत्रीय अधिकारी क यांनी शिफारस केलेप्रमाणे---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील पवना नदीचे पात्रामधील दापोडीसांगवी,नवी सांगवी या भागामध्ये मोठया प्रमाणात हायसिंथची वाढ झालेली असलेने जास्त प्रमाणात डासनिर्मिती मध्ये वाढ झालेली आहे.जलपर्णी निर्मुलनामुळे डासांवर नियंत्रण करणेकामी तातडीचा उपाय म्हणुन जलपर्णी काढणेचे काम करुन घेणेत आलेले आहे.सदर कामासाठी लागणारी तरतद पुरेशी नसल्यामुळे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षामधील ठेकेदार पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखाशिर्षावरील शिल्लक र.रु.४,२५,३३२/- तरतुदीमधुन १) मा.आयुक्त यांचेकडील आदेश .कक्षेका/आ१५/कावि/२१७/२०१५ दि.४/३/२०१५ अन्वये,सन २०१४-१५ करिता ठेकेदार पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखाशिर्षामधुन ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मुलन करणे या लेखाशिर्षावर ररु.२,००,०००/- वर्ग करणेस तसेच २) मा.आयुक्त यांचेकडील आदेश .कक्षेका/आ१५/कावि/२६४/२०१५ दि.२०/३/२०१५ अन्वये,सन २०१४-१५ करिता ठेकेदार पध्दतीने नाले व गटर साफ करणे या लेखाशिर्षामधुन ठेकेदार पध्दतीने हायसिंथ निर्मुलन करणे या लेखाशिर्षावर र.रु.१,००,०००/- असे एकुण र.रु.३,००,०००/- वर्ग करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली असलेने सदरचे खर्चास व तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- १२४ विषय क्रमांक- ७

दिनांक- ०३/६/२०१५ विभाग-

सुचक- मा. प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.रोहितआप्पा काटे

संदर्भ- मा.प्रशांत शितोळे,मा.रोहितअप्पा काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनाधिकृत बांधकामांचा प्रश्न अतिशय जटील झाला व त्यामुळे आज अनेक सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.वास्तविक पाहता औदयोगिक नगरीमध्ये समाविष्ठ असणा-या विविध गावांमध्ये १०० स्कवेअर फुटांपासून ते ३००० स्कवेअर फुटांपर्यंत छोटे भूखंड करुन त्याची खरेदी-विक्री झाली महानगरपालिका बांधकाम नियंत्रण मध्ये छोटया बांधकामाकरिता परवानगी प्रक्रिया अतिशय किचकट असल्याने छोटे भूखंडधारक विशेषता २०० स्कवेअर मीटरपर्यंतचे भूखंड मालक महानगरपालिकेकडे परवानगीसाठी आलेच नाहीत,त्यामुळे शहरातील असंख्य छोटया भूखंडधारकांनी किचकट-वेळखाऊ बांधकाम परवानगी प्रक्रिया असल्याने परवानगीविना बांधकामे केली व त्याच अनाधिकृत बांधकामाचे स्वरुप आज शहरात कठीण स्वरुपात दिसत आहे.याकरिता शहरातील छोटया भूखंडधारकांना सोप्या पध्दतीने बांधकाम परवानगी महानगरपालिकेने देणे आवश्यक आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही प्रमाणात सुधारणा व बदल होणे गरजेचे आहे.यासाठी २०० स्कवेअर मीटर पर्यंतच्या छोटया आकाराच्या भूखंडासाठी खालीलप्रमाणे बदल व्हावेत व **MRTP** च्या कलम १९६६ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीमध्ये

**१)** शहरात २०० स्कवेअर मीटरच्या भूखंडापर्यतची मोजणी महानगरपालिका ठरवेल इतकी माफक फी आकारुन महानगरपालिकेच्या नगररचना व बांधकाम परवानगी विभाग यांचेमार्फत संयुक्तरित्या केली जाईल व तद्नंतर मा.जिल्हाधिकारी व मा.नगर भू-मापन अधिकारी यांना कळविणेत येईल.

**२)** २०० स्कवेअर मीटरपर्यंतचे जागेचे क्षेत्रफळास दाटवस्ती **( Congested Area)** चे बांधकाम परवानगी नियम लागू असावे.

**३) Congested Area** मधील २०० स्कवेअर मीटर पर्यंतचे क्षेत्रफळास कमाल २.०० चटई निर्देशांक लागू राहिल.

**४) Congested Area** मधील पार्किंग नियमावलीत बदल करणे.

५) **Congested Area** मध्ये Shifted Boundary शिथील करणे. याप्रमाणे बदल होणेकामी मा.महापालिका सभेमार्फत मा.शासन मान्यतेस पाठविणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- १२५ विषय क्रमांक- ८

दिनांक- ०३/६/२०१५ विभाग-

सुचक- मा. प्रशांत शितोळै अनुमोदक- मा.रोहितआप्पा काटे

संदर्भ- मा.प्रशांत शितोळे,मा.रोहितअप्पा काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये शहरातील सर्व हद्दीमध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या छोटया घरांची समस्या जटील झाली आहे.कामगार नगरीमध्ये लहान घरांचे भूखंड घेऊन लहान आकाराच्या घरांची संख्या मोठया प्रमाणात आहे व गेल्या काही वर्षामध्ये या लहान आकाराच्या भूधारकांनी महानगरपालिकेची बांधकाम परवानगी प्रक्रिया किचकट व तुलनात्मकदृष्टया लहान घरांना अधिक खर्चीक असल्याने या लहान आकाराच्या स्वमालकीच्या भूखंडावर अनाधिकृत बांधकामाची संख्या मोठया प्रमाणात झाली आहे.महानगरपालिका कार्यक्षेत्रातील छोटया आकाराच्या स्वमालकीच्या दोन हजार चौरस ( २००० चौ.फुट ) फुटांपर्यंत क्षेत्रफळाच्या भूखंडाकरिता काही प्रमाणातील अधिकचा

चटई निर्देशांक वापरणेकरिता व याकरिता महानगरपालिकेचे या क्षेत्रफळापर्यंतचे बांधकाम परवानगीचे किचकट नियमांमध्ये नागरिकांचे हिताचे दृष्टीने काही प्रमाणात शिथिलता करणे आवश्यक असल्याने व याकरिता महानगरपालिकेने धोरणात्मक निर्णय घेऊन बांधकाम नियमावलीत बदल करणे व या नियमावलीस महाराष्ट्र शासनाचे नगरविकास खात्याकडून मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत दोन हजार चौरस फुट ( २००० चौ.फूट) क्षेत्रफळांपर्यंतचा चटई निर्देशांक देणेबाबतच्या धोरणात्मक निर्णयास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(मोटे किरण बाळासाहेब )
सभापती क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/ ६६/२०१५
दिनांक ४/६/२०१५



प्रशासन अधिकारी तथा
सचिव(सभाशाखा) क प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

ठराव क्रमांक- १२४ विषय क्रमांक- ७
दिनांक- ०३/६/२०१५ विभाग-
सुचक- मा. प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.रोहितआप्पा काटे
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे,मा.रोहितअप्पा काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये अनाधिकृत बांधकामांचा प्रश्न अतिशय जटील झाला व त्यामुळे आज अनेक सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.वास्तविक पाहता औदयोगिक नगरीमध्ये समाविष्ठ असणा-या विविध गावांमध्ये १०० स्कवेअर फुटांपासून ते ३००० स्कवेअर फुटांपर्यंत छोटे भूखंड करुन त्याची खरेदी-विक्री झाली महानगरपालिका बांधकाम नियंत्रण मध्ये छोटया बांधकामाकरिता परवानगी प्रक्रिया अतिशय किचकट असल्याने छोटे भूखंडधारक विशेषता २०० स्कवेअर मीटरपर्यंतचे भूखंड मालक महानगरपालिकेकडे परवानगीसाठी आलेच नाहीत,त्यामुळे शहरातील असंख्य छोटया भूखंडधारकांनी किचकट-वेळखाऊ बांधकाम परवानगी प्रक्रिया असल्याने परवानगीविना बांधकामे केली व त्याच अनाधिकृत बांधकामाचे स्वरुप आज शहरात कठीण स्वरुपात दिसत आहे.याकरिता शहरातील छोटया भूखंडधारकांना सोप्या पध्दतीने बांधकाम परवानगी महानगरपालिकेने देणे आवश्यक आहे. यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही प्रमाणात सुधारणा व बदल होणे गरजेचे आहे.यासाठी २०० स्कवेअर मीटर पर्यंतच्या छोटया आकाराच्या भूखंडासाठी खालीलप्रमाणे बदल व्हावेत व **MRTP** च्या कलम १९६६ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीमध्ये

**१)** शहरात २०० स्कवेअर मीटरच्या भूखंडापर्यतची मोजणी महानगरपालिका ठरवेल इतकी माफक फी आकारुन महानगरपालिकेच्या नगररचना व बांधकाम परवानगी विभाग यांचेमार्फत संयुक्तरित्या केली जाईल व तद्नंतर मा.जिल्हाधिकारी व मा.नगर भू-मापन अधिकारी यांना कळविणेत येईल.

**२)** २०० स्कवेअर मीटरपर्यंतचे जागेचे क्षेत्रफळास दाटवस्ती **( Congested Area)** चे बांधकाम परवानगी नियम लागू असावे.

**३)** **Congested Area** मधील २०० स्कवेअर मीटर पर्यंतचे क्षेत्रफळास कमाल २.०० चटई निर्देशांक लागू राहिल.

**४)** **Congested Area** मधील पार्किंग नियमावलीत बदल करणे.

५) **Congested Area** मध्ये Shifted Boundary शिथील करणे. याप्रमाणे बदल होणेकामी मा.महापालिका सभेमार्फत मा.शासन मान्यतेस पाठविणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----